# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.11.2024** **वारःशनिवार**

---

1. राज्यभरात दीपोत्सवानिमित्त चैतन्याचं वातावरण; लक्ष्मीपूजनानंतर आज पाडव्याचा उत्साह.
2. रेल्वे तिकीट आरक्षणाचे नवीन नियम लागू, दिवाळी छठ पूजेनिमित्त रेल्वेकडून विशेष गाड्यांची सोय.
3. सी-व्हिजिल ॲपवर निवडणूक आचारसंहिता भंगाच्या 2 हजार 62 तक्रारी दाखल; 234 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त आणि
4. न्यूझीलंडविरुद्धच्या मुंबई क्रिकेट कसोटीतही भारताच्या आघाडीच्या फलंदाजांकडून निराशाजनक कामगिरी.

**दिवाळी**

दिवाळीच्या सणातील महत्त्वाचा लक्ष्मी पूजनाचा सण काल संपूर्ण राज्यात अत्यंत आनंदात आणि उत्साहात साजरा झाला. घरोघरी आकाशकंदील, पणत्या, विजेच्या दिव्यांची आकर्षक रोषणाई, रांगोळ्या, या बरोबरीनं आप्तजनांच्या भेटीगाठी, फराळाच्या पदार्थांची मेजवानी असं चैतन्याचं वातावरण होतं. संध्याकाळी घराघरात, दुकानांमध्ये तसंच व्यावसायिक अस्थापनांमध्ये पारंपरिक पद्धतीनं लक्ष्मीपूजन करण्यात आलं. यावेळी फटाके आणि मनमोहक आतषबाजीनं आसमंत उजळून निघाला होता. दिवाळीच्या निमित्तानं ठीकठिकाणच्या प्रमुख मंदिरांमध्ये दर्शनासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. बहुतांश मंदिरांनाही आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. शिर्डीमधे साईबाबा संस्थानच्यावतीनं दिवाळीनिमित्त साईबाबांच्या समाधी मंदिरात लक्ष्मी कुबेर पूजन करण्यात आलं. पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरातही काल विविध फुलांची आकर्षक आरास करण्यात आली होती.

**मुहूर्ताचे सौदे**

लक्ष्मीपूजनानिमित्त आणि नवीन विक्रम संवत 2081 च्या प्रारंभानिमित्त काल शेअर बाजारात मुहूर्ताचे सौदे झाले. संध्याकाळी 6 ते 7 दरम्यान झालेल्या या सौद्याच्या वेळी मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 335 अंकांनी वधारून 79 हजार 724 अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी 94 अंकांनी वधारून 24 हजार 300 अंकांवर बंद झाला.

**दिवाळी**

प्रकाशाचा उत्सव असलेल्या दिवाळीच्या सणामध्ये आज बलिप्रतिपदा अर्थात विक्रम संवत्सराचा पाडवा साजरा होतो आहे. पती-पत्नीच्या नात्यात दिवाळीच्या पाडव्याचे विशेष महत्त्व असून व्यापारी वर्गाच्या नवीन आर्थिक वर्षाची सुरुवातही आजपासून होते. कृषीवलांच्या संस्कृतीमध्येही बळीराजाची आगळी महती आहे. गावागावांमध्ये सुरू असणाऱ्या काकड आरतीमध्ये आज अन्नकुट अर्थात गोवर्धन पूजेची परंपरा जपली जाते. ऐकूया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**दिवाळीच्या सणासोबतच गावागावांमध्ये लहान मोठ्या मंदिरातून कार्तिकस्नान अर्थात काकड आरतीची परंपरा जोपासली जाते. अश्विनी पौर्णिमा अर्थात कोजागिरी पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमा म्हणजेच त्रिपुरारी**

**पौर्णिमेच्या दरम्यान एक महिन्यांच्या कालावधीत होणाऱ्या या काकड आरतीच्या उपक्रमाच्या मध्यावरच दिवाळीचा सण साजरा होतो. तीर्थक्षेत्रात वर्षभर होणाऱ्या उपासनेचा नित्य उपचार पिढ्यानपिढ्या सुरू असणाऱ्या कार्तिक स्नानाच्या निमित्ताने गावागावांमधल्या घराघरात पोहोचतो. संतांच्या पारंपारिक रचनांचे पाठांतर, समूहातून लोक परंपरा जोपासण्याची संस्कृती यातून वाढीस लागते. दिवाळीच्या पाडव्याला गोपाळकृष्णांनी घालून दिलेली अन्नकुट अर्थात गोवर्धन पूजा सर्वत्र केली जाते. निसर्गाच्या सानिध्यात देवतेचे अस्तित्व शोधण्याचा संदेश आणि ऋतुच्या संक्रमणाच्या कालखंडात दिनचर्येत करण्याचा बदल आपोआप यातून साधतो. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून सुहास देशपांडे**

**विशेष रेल्वे**

दिवाळी आणि छटपूजा सणांच्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रवाशांच्या संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन मध्य रेल्वेनं आज आणि उद्या म्हणजे 2 आणि 3 नोव्हेंबर रोजी अतिरिक्त विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत दोन्ही दिवस मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस आणि पनवेल या स्थानकांवरून गोरखपूर, दानापूर, छपरा, काझीपेठ या ठिकाणांसाठी प्रत्येकी 5 गाड्या सोडल्या जाणार आहेत. त्याचबरोबर हडपसर-हिसार-हडपसर दरम्यान साप्ताहिक विशेष गाडी सोडण्याचा निर्णयही मध्य रेल्वेनं घेतला आहे. 4 नोव्हेंबर ते 18 नोव्हेंबर दरम्यान ही गाडी सोडण्यात येणार आहे.

**रेल्वे आरक्षण**

रेल्वे तिकीट आरक्षणाचे नवीन नियम कालपासून लागू झाले आहेत. त्यानुसार रेल्वे आरक्षणाची या आधीची 120 दिवसांची मुदत रद्द करण्यात आली असून ती आता 60 दिवस करण्यात आली आहे. मात्र, 31 ऑक्टोबरपर्यंत झालेली आरक्षणं कायम राहतील अशी माहिती रेल्वेनं दिली आहे. 60 दिवसांच्या आरक्षण कालावधीमुळे तिकिटांच्या उपलब्धतेच्या शक्यता वाढून त्याचा प्रवाशांना थेट लाभ मिळेल असं रेल्वे प्रशासनानं म्हटलं आहे.

**एलपीजी दर वाढ**

व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात 62 रुपये वाढ झाली आहे. तेल कंपन्यांनी जाहीर केलेल्या सुधारित दरपत्रकानुसार 19 किलो वजनाचा सिलेंडर आता 1 हजार 740 रुपयांऐवजी 1 हजार 802 रुपयांना मिळेल. 5 किलो वजनाच्या सिलेंडरसाठी आता 15 रुपये जास्त मोजावे लागतील मात्र 14 किलो 200 ग्रॅमच्या सिलेंडरच्या दरात बदल झालेला नाही.

**निवडणूक**

राज्यात विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून कालपर्यंत सी-व्हिजिल ॲपवर 2 हजार 62 तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यापैकी 2 हजार 59 तक्रारी निवडणूक आयोगानं निकाली काढल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. राज्य शासन आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, अमली पदार्थ आणि मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत 234 कोटी 49 लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

**गुन्हा**

मुंबादेवी विधानसभा मतदार संघातल्या शिवसेनेच्या उमेदवार शायना एन. सी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांच्या विरोधात काल गुन्हा दाखल

करण्यात आला. महिलांचा मान सन्मान करणं ही आपली संस्कृती आहे, मात्र अरविंद सावंत यांनी अश्लाघ्य शब्दांत महिलांचा अपमान केला. ही त्यांची संस्कृती आहे का, असा सवाल शायना एन. सी यांनी केला आहे.

**सदा सरवणकर**

शिवसेनेचे मुंबईतले माहीमचे उमेदवार सदा सरवणकर यांनी, आपण निवडणूक लढवण्यावर ठाम असून कदापी माघार घेणार नसल्याचं काल स्पष्ट केलं. यासंदर्भात वर्षा या शासकीय निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्याचा आपण प्रयत्न केला, मात्र त्यांची भेट होऊ शकली नाही, असं सरवणकर यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनी माहीम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला असून, भाजपानं त्यांना पाठिंबा देण्याची तयारी दाखवली आहे.

**आरटीओ कारवाई**

दिवाळीनिमित्त बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांची खासगी बसचालकांकडून लूट होऊ नये यासाठी पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने विशेष मोहीम हाती घेतली होती. त्या मोहिमेअंतर्गत शहरातील 106 खासगी बसची तपासणी वायुवेग पथकाने केली. त्यापैकी 65 बसचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून त्यांना विविध कारणांमुळे, 4 लाख 64 हजार रुपये दंड ठोठावला आहे. त्यापैकी एक लाख 78 हजार रुपयांचा दंड वसूल केला असल्याची माहिती पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी दिली आहे.

**ठाणे पालिका**

ठाणे महानगरपालिकेले स्वच्छ सर्वेक्षण मोहिमेत पुनर्निर्माण अभियान हाती घेतलं आहे. या अभियानात दीपावलीत जमा होणारा सुका कचरा संकलित करून त्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यासाठी महानगरपालिकेने विविध स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने संकलन केंद्र सुरू केली आहेत. ही संकलन केंद्रे सहा नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहेत. स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने दररोज सुमारे 30 हजार घरापर्यंत हे अभियान पोहचवण्यात येईल. या काळात सुमारे 250 टन सुका कचरा गोळा होईल, असा अंदाज आहे.

**आग**

पुणे शहरात लक्ष्मी पूजनानिमित्त काल रात्री उडवण्यात आलेल्या फटाक्यांमुळे 31 ठिकाणी आग लागल्याची माहिती पुणे अग्नीशमन दलानं दिली आहे. अग्निशमन विभागाच्या तत्परतेमुळे आग तातडीने नियंत्रणात आणण्यात आली. यामध्ये कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झालं नाही.

**बुडून मृत्यू-सोलापूर**

सोलापूर जिल्ह्यात माढा तालुक्यात चार ऊसतोड मजुरांचा नदीपात्रात बुडून मृत्यू झाला. माढा इथं जगदाळे वस्तीवर यवतमाळ जिल्ह्यातून आलेल्या ऊसतोड मजुरांपैकी काही जण काल दुपारी अंघोळीसाठी खैराव इथं सीना नदीवर गेले असता, पाण्याचा अंदाज न आल्याने चौघांचा बुडून मृत्यू झाला.

**पाऊस पिक-सोलापूर-सांगली**

सोलापूर जिल्ह्यात यंदा झालेल्या अतिरिक्त पावसामुळे कांदा पीकाचं मोठं नुकसान झालं आहे. शेतात पाणी साचल्याने ओला झालेला आणि पाण्यामुळे डागळलेला हा कांदा व्यापारी विकत घेत नाहीत. त्यामुळे कवडीमोल किंमतीत तो कांदा बाजारातच सोडून जाण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. सांगली जिल्ह्यातील मिरज, तासगाव, कवठेमहांकाळ,

आटपाडी आणि पलूस तालुक्यात काल सकाळी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. या पावसाचा द्राक्ष पिकावर विपरीत परिणाम होण्याची भीती असल्याने द्राक्ष बागायतदार चिंतेत आहेत.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना कालपासून मुंबईच्या वानखेडे मैदानावर सुरू झाला. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत पहिल्या डावात सर्वबाद 235 धावा केल्या. रविंद्र जडेजानं 5, तर वॉशिंग्टन सुंदरनं 4 गडी बाद केले. न्यूझीलंडच्या डॅरील मिचेल यानं सर्वाधिक 82 धावा केल्या. त्यानंतर फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली, नाईट वॉचमन म्हणून आलेला मोहम्मद सिराज आणि यशस्वी जयस्वाल एका पाठोपाठ एक तंबूत परतले. दिवसअखेर भारताच्या पहिल्या डावात 4 बाद 86 धावा झाल्या होत्या. शुभमन गील 31 तर ऋषभ पंत 1 धाव करून खेळपट्टीवर आहे. भारत 149 धावांनी पिछाडीवर आहे. या मालिकेतले पहिले दोन्ही सामने जिंकून न्यूझीलंडनं मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे.

**हवामान**

कोकणात आज जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.